प्रेस प्रकाशनी **PRESS RELEASE**

**भारतीय रिज़र्व बैंक**
**RESERVE BANK OF INDIA**

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001
**Department of Communication**, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai - 400 001 फोन/Phone: 022 - 2266 0502

01 ऑगस्ट, 2024

**भारतीय रिझर्व बँकेने श्रीकृष्ण को-ऑपरेटीव बँक लिमिटेड, उमरेड, महाराष्ट्र ला आर्थिक दंड ठोठावला.**

भारतीय रिझर्व बँकेने दिनांक 26 जुलै, 2024, च्या आदेशाद्वारे श्रीकृष्ण को-ऑपरेटीव बँक लिमिटेड, उमरेड, महाराष्ट्र (बँक) ला, बँकेने ' संचालक, त्यांचे नातेवाईक आणि फर्म/ संस्था ज्यामध्ये त्यांना स्वारस्य आहे, त्यांना ऋण व अग्रिम देण्यासंबंधी' भारतीय रिझर्व बँकेने जारी केलेल्या दिशानिर्देशांचे पालन न केल्याबद्दल ₹2.08 लाख ( केवळ दोन लाख आठ हजार रुपये) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. हा दंड बँकिंग नियमन कायदा, 1949 (BR कायदा) च्या कलम 47A(1)(C) सह लागू असलेल्या कलम 46(4)(i) आणि कलम 56 अन्वये, भारतीय रिजर्व बँकेला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून ठोठावण्यात आला आहे.

31 मार्च, 2023 रोजीच्या आर्थिक स्थितीवर आधारित बँकेची वैधानिक तपासणी भारतीय रिझर्व बँकेद्वारे केली गेली होती. या तपासणी अहवालातील पर्यवेक्षी निष्कर्षांचे भारतीय रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार पालन न केल्याने आणि यासंबंधी केलेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे बँकेला नोटीस बजावण्यात आली होती. त्यात म्हटल्याप्रमाणे, वरील निर्देशांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल बँकेला दंड का आकारला जाऊ नये याची कारणे दाखवा, अशी विचारणा करण्यात आली होती. नोटीसला बँकेने दिलेले उत्तर व वैयक्तिक सुनावणीच्या वेळी बँकेने सादर केलेले तोंडी निवेदन विचारात घेता, अन्य बाबींसह, भारतीय रिझर्व बँकेला असे आढळले की बँकेने संचालक, किंवा त्यांचे नातेवाईक आणि त्यांच्यात स्वारस्य असलेल्या फर्म/ संस्थेला, संचालकांशी संबंधित ऋण व अग्रिम (निधी व अनिधी आधारित) मंजूर केल्याचा आरोप सिद्ध होतो आणि आर्थिक दंड लावला जाणे आवश्यक आहे.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यामध्ये बँकेने तिच्या ग्राहकांशी केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही. तसेच, हा आर्थिक दंड बँकेविरुद्ध भारतीय रिझर्व बँकेने सुरू केलेल्या इतर कोणत्याही कारवाईबाबत पूर्वग्रह न ठेवता लावण्यात आला आहे.

**(पुनित पंचोली)**
मुख्य-महाप्रबंधक

**प्रेस प्रकाशनी: 2024-2025/818**